# वैद्यकीय साहाय्य योजना

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सभासदांना व त्यांच्या वैवाहिक जोडीदारास, उपचारार्थ, रुग्णालयात दाखल करावे लागले तर अशा अडचणी प्रसंगी, संस्थेच्या वतीने थोडाफार आर्थिक मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने, वैद्यकीय सहाय्य निधी निर्माण करण्यात येऊन, या निधीतून आर्थिक मदत देण्याची संकल्पना मूर्त स्वरूपात राबविण्यात येत आहे. ही वैद्यकीय साहाय्य योजना सन १९९६ पासून सुरू करण्यात आलेली असून नियमात / धोरणात वेळोवेळी सभासदांच्या हिताचा विचार करून, त्यामध्ये योग्य ते बदल करण्यात आलेले आहेत.

१ जानेवारी २०२१ पासून या योजनेने अंतर्गत देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीची रक्कम वाढविण्यात आली असून जास्तीत जास्त मर्यादा रु. ३०,०००/- वरून रु.४०,०००/- करण्यात आलेली आहे. सदर योजना सभासद पती- पत्नी यांच्या पुरतीच मर्यादित आहे.

बृहन्मुंबई मनपा निवृत्ती वेतनधारक वा कुटुंब निवृत्तीवेतन धारकांने बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशनचे सभासदत्व प्राप्त झाल्याच्या दिनांक पासून ३ वर्ष पूर्ण झाल्यावर, सभासद या आर्थिक साहाय्य योजनेच्या लाभास पात्र होतो.

वैद्यकीय सहाय्य निधी योजना अंत:र्गत आर्थिक मदत प्राप्त होण्यासाठी खालील नमूद केलेल्या अटी / नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१) छापील अर्ज असावा, अर्जात पूर्ण पत्ता व पिन कोड, मोबाईल क्रमांक नमूद करावा.

२) अर्जासोबत देयकाच्या मूळ प्रति जोडाव्यात.

३) हॉस्पिटलचा खर्च २.०० लाखावर होत असेल तर इतर किरकोळ देयके जोडण्याची आवश्यकता नाही.

४) रुग्णालयाचे ॲडमिशन डिस्चार्ज कार्ड तसेच डॉक्टरांचे निदान व शस्त्रक्रियेबद्दल माहिती हयाचे सर्टिफिकेट जोडावे.

५) ह्या योजनेत सहाय्य मागण्यासाठी अर्ज करताना त्या सभासदाचा वैद्यकीय खर्च किमान रु.४०,०००/– असणे आवश्यक आहे.

६) डिस्चार्ज मिळाल्यावर एक वर्षात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यापासून डिसचार्ज मिळेपर्यंत औषध खरेदी पोटीची देयके सादर करावीत किंवा पुढील मागील ३० दिवसातील देयके असावीत.

७) अर्जदार सभासदास इतर संस्था / आस्थापनाद्वारे आर्थिक मदत मिळाली असल्यास वा मेडिक्लेम द्वारे मदत मिळाली असल्यास / मदत, मेडिक्लेम व्यतिरिक्त जेवढी जादा रक्कम खर्च झालेली आहे त्या रकमेच्या २० % प्रमाणे प्रतिपुर्ती करण्यात येईल.

८) अर्जासोबत आधार कार्ड /पॅन कार्ड तसेच रद्द केलेल्या धनादेशाची प्रत जोडावी.

९) वैद्यकीय साह्यासाठी सभासदाने वैध/ परिपुर्ण अर्ज सादर केल्यावर प्रत्यक्ष अधिदांना पूर्वी सभासदाचा मृत्यू झाल्यास देय रक्कम वैध वारसास देय होईल. ( वारसांची योग्य कागदपत्रे सादर केल्यानंतर ).

१०) सभासदांच्या हितासाठी वेळोवेळी नियमात बदल करण्याचा अधिकार सदर वैद्यकीय समितीचा असेल. वैद्यकीय समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहतील. आर्थिक मदतीचे अधिदान, निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

या योजनेअंतर्गत आर्थिक मदत प्राप्त होण्यासाठी करावयाच्या अर्जाचा विहीत मसुदा, वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.